पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

## प्रेस नोट

दिनांक :- १८/०७/२०२३

# आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम ( AEPS ) व्दारे लाखो रूपयांची ऑनलाईन फसवणूक करणारी टोळी जेरबंद - नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांची कामगिरी

---

नांदगाव पोलीस ठाणे हद्दीतील पळाशी गावामधील काही नागरीकांचे बॅंक खात्यांवरून ऑनलाईन फसवणूकीव्दारे संमतीशिवाय अपरोक्ष पैसे काढून घेतले जात होते. सदर बाबत नागरीकांनी संबंधीत बॅंक मॅनेजर यांचेकडे तक्रार केली असता, त्यांना समर्पक माहीती न मिळाल्याने त्यांनी नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय येथे तक्रार केली होती. सदर तक्रारीबाबत नाशिक ग्रामीण सायबर पोलीसांनी तात्काळ दखल घेवून चौकशी केली असता, पळाशी, ता. नांदगाव येथील सुमारे १५ लोकांचे AEPS (आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम) सेंटर येथून अंगठयाचे ठशांव्दारे परस्पर आनलाईन पैसे काढून घेतले असल्याबाबत माहीती मिळाली. त्यावरून सायबर पोलीस स्टेशन गुरनं ०८/२०२३ भादवि कलम ४२० सह आय टी ॲक्ट ६६ क, ६६ ड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात अज्ञात इसमांनी पळाशी गावातील नागरीकांचे बॅंक ऑफ महाराष्ट्र शाखा वेहळगाव, ता. नांदगाव येथील खात्यांमधून संमतीशिवाय आर्थिक फसवणूक करण्याचे इराद्याने एकूण २,६६,७९९/- रूपये कुठल्यातरी AEPS (आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम) सेंटर येथून अंगठयाचे ठशांव्दारे पैसे काढून घेतले म्हणून श्री.समाधान संजय घुगे, रा.पळाशी, ता.नांदगाव यांनी फिर्याद दिली होती.

सदर प्रकरणी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी सायबर पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांना तांत्रिकदृष्टया तपास करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी आदेशित केले होते. त्यानुसार नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सत्यजित आमले यांचे पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. दिपक देसले व पोलीस अंमलदारांनी वरील प्रकरणातील AEPS (आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम) सेंटर बाबत तांत्रिक विश्लेषणाव्दारे माहीती काढून चाळीसगाव तालुक्यातून संशयित नामे **१) किशोर लक्ष्मण सोनवणे,** वय २१, रा. उपखेडा, ता. चाळीसगांव, जि. जळगांव, **२) रविंद्र विजय गोपाळ**, वय २३, रा. बानगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव, व **३) सोमनाथ काकासाहेब भोंगाळ,** वय २३, रा. बानगांव, ता. चाळीसगांव, जि.जळगांव यांना ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवून वरील गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता, त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

यातील आरोपी किशोर सोनवणे हा प्रधानमंत्री ग्रामीण डिजीटल साक्षरता अभियान अंतर्गत ऑनलाईन परिक्षांचे रजिस्ट्रेशन फॉर्म भरण्याचे काम करत होता. सध्या तो धुळे येथे अभियांत्रिकी महाविद्यालयात कॉम्प्युटर इंजिनियरींगचे शिक्षण घेत आहे. तसेच त्याचे दोन्ही साथीदार रविंद्र व सोमनाथ हे सध्या चाळीसगांव येथील आधारसेवा केंद्रावर काम करत होते. त्यांचेकडे अधिक तपास केला असता, त्यांनी माहे जानेवारी २०२३ मध्ये नांदगाव तालुक्यातील पळाशी व वेहेळगाव येथे आधारकार्ड अपडेशन कॅम्प घेतला होता. सदर कॅम्पमध्ये उपस्थित नागरीकांचे बायोमॅट्रीक फिंगर स्कॅनरव्दारे अंगठयांचे ठसे घेण्यात आले होते. यातील आरोपींनी नागरीकांचे अंगठयांचे ठशांचा डाटा संकलीत करून त्याव्दारे CSC Digipay ऑनलाईन मनी ट्रान्सफर सर्व्हीस ॲपमध्ये नागरीकांचे ठशांचा वापर करून संबंधीतांचे बॅंक खात्यांवरून परस्पर पैसे काढून घेतले असल्याबाबत कबुली दिली आहे. सदर आरोपींचे कब्जातून लॅपटॉप, मोबाईल स्मार्टफोन, फोर फिंगर स्कॅनर मशिन, आयरीस मशिन असे साहीत्य जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपींनी अलिशान जीवन व मौज-मजेसाठी सर्वसामान्य नागरीकांची ऑनलाईन फसवणूक करून पैसे काढले असल्याचे तपासादरम्यान कबुल केले आहे.

**नागरीकांना आवाहन :-**

नाशिक ग्रामीण जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासनमान्य आधारसेवा केंद्रावर जाऊनच आपली आधार संबंधीत माहीती अद्यावत करावी. कोणीही इसम अशाप्रकारे अनाधिकृत आधार अपडेशन कॅम्प घेत असेल तर नजीकचे पोलीस ठाणेशी तात्काळ संपर्क करावा. तसेच आधारकार्ड अद्यावत करण्याचे नावाखाली AEPS (आधार ईनेबल पेमेंट सिस्टीम) सेंटरव्दारे ऑनलाईन फसवणूक झाल्यास त्वरीत संबंधीत बॅंक शाखा, नजीकीचे पोलीस ठाणे अथवा नाशिक ग्रामीण सायबर पोलीस ठाणे (०२५३-२२००४०८) येथे संपर्क साधावा.

सदर गुन्हयाचे तपासात सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.सत्यजित आमले, सपोनि सुनिल पाटील, सपोनि सारीका चौधरी, पोउनि दिपक देसले, पोहवा बिपीन चौधरी, पोना प्रमोद जाधव, परिक्षित निकम, चापोहवा डि.बी.बागुल, पोना नितीन करंडे, प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले, पोकॉ सुनिल धोक्रट, आकाश आंबोरे, तुषार खालकर, मपोकॉ माधुरी जाधव यांचे पथकाने सदरची कामगिरी केली आहे.

यातील आरोपींना वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने त्यांची ०३ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोनि श्री. सत्यजित आमले यांचे पथक करीत असून तपासाअंती यातील आरोपींकडून अजून काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पोलीस पथकाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेवून पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी तपास पथकास १०,०००/- रु. चे बक्षीस जाहीर करुन सर्वांचे अभिनंदन केले आहे.